# विद्यापीठ अनुदान मंडळाचे कमला कॉलेजला अर्थसहाय्य

कोल्हापूर, ता. २१ - विद्यापीठ अनुदान मंडळाने आठव्या योजनेंतर्गत कमला कॉलेजला क्रीडासाहित्य अनुदान म्हणून एक लाख ४० हजार रुपये मंजूर केले आहेत. या कॉलेजने विद्यापीठ, आंतरविद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध क्रीडा स्पर्धांत नैपुण्य दाखविल्यामुळे हे अनुदान मिळाले आहे. याकामी प्राचार्य क्रांतीकुमार पाटील व संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील यांनी प्रयत्न केले.

दैनिक केसरी

२२/१/९३